ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 10 | ISSUE - 5 | JANUARY - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पंढरीची वारी



**अमोलकुमार कल्याण गिरी , डॉ.वामन मुरलीधर जाधव**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठ, सोलापूर.

## १.१ प्रस्तावना:-

हया अखंड जगामध्ये भारताची संस्कृती ही महान विश्वविख्यात आहे. भारतीय संस्कृतीमधील अलौकिक व अद्भूत अशी एक प्राचीन संस्कृती म्हणजे 'पंढरीची वारी' सावळया विठ्ठलाच्या दर्शनासाठी आळंदी ते पंढरपूर हा पायी प्रवास वारकरी भाविक मोठया आत्मतियने व आतुरतेने करत असतात, कडेवरी हात ठेवून गेली अठ्ठावीस युगे विटेवरी उभा असणारा हा भगवंत विठ्ठल सोलापूर जिल्हयातल पंढरपूर या धार्मिक स्थानी प्रस्थापित आहे.

सोलापूर शहरापूसन केवळ ७२ किलोमीटर अंतरावर असणारे हे पंढरपूर हा अखंड विठ्ठल भक्त आणि भाविकांसाठी अध्यात्मिक व पवित्र असे स्थान आहे हया पवित्र अशा पंढरीचे वर्णन करताना संत नामदेव महाराज आपल्या एका अभंगामध्ये म्हणतात की,

[१]"जेव्हा नव्हते चराचर ।तेव्हा होते पंढरपूर ॥
जेव्हा नव्हती गोदा गंगा।तेव्हा होती चंद्रभागा ॥
चंद्रभागेचे तटी।धन्य पंढरी गोमटी ॥"[१]

संत नामदेव यांच्या अभंगाप्रमाणे आजच्यास्थिती मध्ये पाहता हे सत्य भासते कारण याची प्रचिती ही इतिहासकार ही देतात. हया अमोल अशा वारीचे वर्णन करताना अनेक अभ्यासक, तज्ञ संशोधक व लेखक आपले मत आपल्या ग्रंथामध्ये तसेच पुस्तकामध्ये मांडताना म्हणतात की, पंढरीच्या हया वारीचा इतिहास हा खूप मोठा आहे त्याबद्दल

'महाराष्ट्राची अध्यात्मिक राजधानी तीर्थक्षेत्र दर्शन-यात्रा' या पुस्तकामध्ये पंढरपूर व विठ्ठलचा संबंध सांगताना पुस्तकाचे लेखक रा.श्री.अंकुलकर आपल्या पुस्तकात लिहितात.

[२]"अचलनंदाना इ.स.८०१ मध्ये भागीरथी महानदीच्या तीरावर विठुरायांनी साक्षात्कारी दर्शन दिले असा उल्लेख आहे.अचलनंदासह कर्नाटकातील ब्राम्हणतीर्थ व्यासराय आणि श्रीपादराय या वैष्णवपंथी संतांना भीमानदीच्या पात्रामध्ये विठ्ठलाची मूर्ती सापडली होती ॥"[२]

आपली ही राजधानी महाराष्ट्र प्रामुख्याने संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.संताच्या अभंगातून भारुडातून, पोहयातून तसेच अनेक साहित्यातून चांगले संस्कार व प्रबोधनाचे कार्य केलेले आहे.पंढरीची वारी ही नेमकी कधी सुरु झाली हे

निश्चितपणे सांगता येणार नाही. परंतु काही ज्येष्ठ वारकरी, किर्तनकार, तज्ञ व्यक्ती, अभ्यासक व काही वर्तमान पत्रातून असे दिसून आले की, संत ज्ञानेश्वरांचे वडिल विठ्ठलपंत कुलकर्णी हे पंढरीच्या वारीचे पहिले वारकरी होते. त्यांच्या सोबत संत ज्ञानेश्वर, संत निवृत्ती, संत सोपानदेव आणि संत मुक्ताबाई हे देखील विठ्ठलपंतांच्या संगतीने वारीला गेले होते. याबद्दलचा दाखला देत संत ज्ञानेश्वर आपलया एका अभंगात लिहितात,

[३]"साधु संत मायबाप लिही
केले कृपादान ।चंद्रभागा स्नान।। "[३]

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम, संत मुक्ताबाई अशा अनेक संतांनी सर्व धर्माचे लोक एकत्रित येवून सामाजिक बंधूता करणारी ही परंपरा चालू ठेवली . लहान-थोर व कुठलाही भेदभाव न बाळगता वारकरी एकमेकांच्या पाय पडतात.तेंव्हा तो समोरच्या व्यक्तीतील देवत्वाला नमस्कार असतो.हया वैष्णवांच्या मेळयाबद्दल वर्णन करताना संत तुकाराम महाराज आपल्या पुढील अभंगात म्हणतात.

[४]"पंढरसी नाही कोणा अभिमान ।
पाया पडे जन एकमेका।।
तुका म्हणजे जाय एकवेळ पंढरी ।
तयाचित घरी यम न ये।।"[४]

पंढरीची वारी ही प्रामुख्याने दोन वेळा असते आषाढी वारी व कार्तिकी वारी संत नामदेवांनी विठ्ठलाच्या आरतीत आषाढी व कार्तिकी वारीचा उल्लेख करताना आपल्या पुढील अभंगामध्ये म्हणतात.

[५]"आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती।।
दर्शन हे कामाचे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव ओवाळती।।"[५]

वरील अभंगामध्ये संत नामदेव महाराज म्हणतात की, आषाढी व कार्तिकी या एकादशी दिवशी जे भाविक वारकरी येतात, त्यांनी पंढरीतील चंद्रभागा या नदीमध्ये स्नान करुन विठ्ठलाच्या दर्शनाने मुक्त व्हावे असे म्हणत त्यांनी पंढरपूरच्या चंद्रभागा नदीच्या बाबीतत महत्वपणा सांगितला आहे.

'तीर्थक्षेत्र पंढरपूरातील श्री विठ्ठल मंदिरातील १६ खांबी मंडपाच्या तुळईवर इ.स.१२२६ मधील लेख पाहण्यात आला तुळईच्या पूर्व भागातील ७१ व्या ओळीत वारीचा उल्लेख सर्वात प्राचीन आहे.'यावरुन किमान ७००-८०० वर्षापुर्वी महाराष्ट्राला पंढरीच्या आषाढी वारीचा ध्यास होता असे दिसून येते.

## समोराप :-

वारकरी संप्रदायाचे साहित्य वाड्मय हे खूपच महान व अद्भूत आहे.वारकरी संप्रदायाची किर्ती आज सात समुद्रपार गेलीआहे.संतांनी दिलेली शिकवण आजही वाटकरी वर्ग आचरणात आणतात.वारीतील प्रत्येक वारकरी एकमेकांच्या पायांवर निस्वार्थपणे डोके ठेवून समानतेचे व बंधुत्वाचे उदाहरण देते. पंढरपूरच्या वारीने सर्व समाजातील लोकांना ज्ञान, भक्ती, समता, बंधूता अशा कितीतरी मुख्य तत्वांची धुरा आत्मसात करण्याची शिकवण संतांनी सुरु केलेल्या हया शब्दात व्यक्त न करता येणाऱ्या पंढरपूरच्या वारीमधून मिळते.

धन्य ते लोक ज्यांनी ही वारी सुरु केली ज्यांनी हया वारीचा विकास करण्यास हातभार लावला.

**संदर्भ सुची**

१) वारकरी सांप्रदायिक भजनी मालिका श्री.मामासाहेब दांडेकर, गुरुदेव प्रकाशन, पंढरपूर, दहावी आवृत्ती, पृ.क्र.२३९, २४०.
२) तीर्थक्षेत्र पंढरपूर, दर्शन यात्रा, श.श्री.अंकुलकर, श्री.स्वामी समर्थ प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती, २००२, पृ.क्र.१५.
३) दैनिक दिव्यमराठी, दि.११ जुलै २०१३, आषाढी विशेषांक पृ.क्र.१
४) दैनिक पुढारी, दि.११ जुलै २०१३ आषाढी विशेषांक, पृ.क्र.१.
५) दैनिक दिव्यमराठी दि.०९ जानेवारी, २०१३, एकादशी विशेषांक, पृ.क्र.१